## दिन विशेष...

१७२६ : काचेच्या पोकळनळ्या निर्माते हेन्री गॅसलर यांचे निधन.
१९५० : 'जन गण मन' या गीताला राष्ट्रगीत म्हणून मान्यता.
१९६६ : अणुशास्त्रज्ञ डॉ.होमी भाभांचे विमान अपघातात निधन झाले.
१९९६ : मुंबई मिस इंडिया सौंदर्य स्पर्धेला प्रारंभ झाला.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८१,५३७.७० -७६९.६६ (०.९४%)
डॉलर ₹ ९१.९१

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १६ |
| दिल्ली | १८ | ०७ |
| मुंबई | ३१ | १८ |
| नागपूर | २९ | १६ |
| पुणे | ३० | ११ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ७६ किंमत : ५ रु. | पाने ४

### सुविचार

शाळा ही ज्ञानमंदिर आहे, इथे मिळालेलं ज्ञान आयुष्यभर साथ देतं.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०७ संध्या-६:१३

### सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५८,१००/- ३,४०,०००/-

### केळी भाव

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

## थोडक्यात

### जैश-ए-मोहम्मदचा पाकिस्तानी दहशतवादी ठार

**श्रीनगर ।** जम्मू-काश्मीरमधील कठुआ जिल्ह्यात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये झालेल्या भीषण चकमकीत एका पाकिस्तानी दहशतवाद्याचा खात्मा करण्यात जवानांना यश आले आहे.मारला गेलेला दहशतवादी जैश-ए-मोहम्मद या संघटनेचा असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिली. बिलावर परिसरात सुरू असलेल्या या शोध मोहिमेमुळे सीमेवरील तणाव वाढला असून सुरक्षा यंत्रणा हाय अलर्टवर आहेत.

### शिंदेंनी ताणून धरताच भाजपचं ठरलं

**मुंबई ।** मुंबई महापालिका निवडणुकीचा निकाल लागून आठवडा होत आला आहे. महापालिका निवडणुकीत महायुतीला काठावरचं बहुमत मिळालं आहे. सत्ता स्थापनेसाठी ११४ जागांचा आकडा गाठण्याची गरज आहे. भाजप आणि शिंदेसेनेचा एकत्रित आकडा ११८ इतका आहे.

# कोणत्याही प्रवर्गातील महिला होऊ शकेल महापौर

## भाजपमध्ये सर्वाधिक ४९ महिला नगरसेविका

वृत्तसंस्था । मुंबई

**मुंबईच्या महापौरपदी महिलाच असणार हे आता स्पष्ट झाले आहे. यंदा महापौर पद हे सर्वसाधारण (महिला) वर्गासाठी राखीव असल्याची सोडत निघालेली असली तरी महापौरपदासाठी कोणत्याही प्रवर्गातून निवडून आलेल्या नगरसेविकेला उमेदवारी देता येणार आहे. भाजपला स्पष्ट बहुमत असून भाजपकडे सर्वाधिक ४९ नगरसेविका आहेत. त्यामुळे नगरसेविकांमधील चुरस वाढली आहे.**



### ➤ भाजपकडे सर्वाधिक नगरसेविका

**मुंबई महापालिकेत यंदा निवडून आलेल्या नगरसेविकांमध्ये सर्वाधिक नगरसेविका भाजपच्या आहेत. त्याखालोखाल शिवसेना (ठाकरे), शिवसेना (शिंदे) यांचे उमेदवार आहेत. भाजपच्या ४९ नगरसेविका निवडून आल्या आहेत. तर शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या ३८ नगरसेविका निवडून आल्या आहेत. महायुतीचा घटक पक्ष असलेल्या शिवसेना (शिंदे) पक्षाच्या १९ नगरसेविका निवडून आल्या आहेत.**

देशातील सर्वात श्रीमंत महापालिका असा लौकिक असलेल्या मुंबई महापालिकेच्या महापौरपदी यावेळी महिलाच असणार हे अखेर स्पष्ट झाले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीनंतरच्या पाच वर्षांच्या कार्यकाळातील अखेरच्या अडीच वर्षांसाठी शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या किशोरी पेडणेकर या महापौर होत्या. यावेळी पुन्हा एकदा हे पद महिलांसाठी राखीव (पान २ वर)

### ● महापालिकेत महिला राज

**मुंबई महापालिकेत यंदा मोठ्या संख्येने नगरसेविका निवडून आल्या असल्यामुळे सर्व समित्यांवरही महिला राज दिसणार आहे. प्रमुख पक्षांच्या पाठोपाठ इतर पक्षांच्याही नगरसेविका मोठ्या संख्येने निवडून आल्या आहेत. काँग्रेसच्या ११ आणि मनसेच्या पाच नगरसेविका निवडून आल्या आहेत. तर एमआयएमच्याही पाच नगरसेविका निवडून आल्या आहेत.भाजपचे एकूण ८९ उमेदवार जिंकले असून त्यापैकी ४९ नगरसेविका आहेत. या नगरसेविका विविध प्रवर्गातून निवडून आल्या आहेत. सर्वसाधारण (महिला) प्रवर्गातून निवडून आलेल्या २७ नगरसेविकांबरोबरच अन्य प्रवर्गातील नगरसेविकांचाही महापौरपदासाठी विचार होऊ शकणार आहे. त्यामुळे महापौरपदासाठीची चुरस वाढली आहे.**

# पोषण आहारात केळीचा समावेश करणार : मंत्री गुलाबराव पाटील



प्रतिनिधी । जळगाव

**प्रशिक्षित युवकांना उद्योग उभारणीसाठी बँकांनी सहकार्य करावे. जिल्ह्यात छोटे-छोटे उद्योग उभे राहावेत यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील. जिल्ह्यातील केळी उत्पादनाला चालना देण्यासाठी अंगणवाडीतील पोषण आहारात केळीचा समावेश करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी येथे दिली.**

जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने केंद्र सरकारच्या जिल्हा जळगाव हे निर्यात केंद्र, या महानिर्यात इग्नाईट कन्व्हेन्शन-२०२६ कार्यशाळेचे उद्घाटन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. त्याठिकाणी बोलताना मंत्री पाटील यांनी जिल्ह्याच्या विकासाची भूमिका मांडली. जिल्ह्याला औद्योगिक क्षेत्रात डी प्लस (पान २ वर)

### लाखो व्यवसाय धोक्यात : राहुल गांधी यांचा दावा

# अमेरिकन टॅरिफमुळे भारतातील ४.५ कोटी नोकऱ्या धोक्यात

वृत्तसंस्था । दिल्ली



**अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची दुसऱ्यांदा सूत्रे हाती घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी जगातील अनेक देशांना अडचणीत आणणारे निर्णय घेतले आहेत. रशियाकडून स्वस्त दरात खनिज तेलाची आयात भारत करत असल्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के आयातशुल्क (टॅरिफ) लादलेलं आहे. एवढंच नाही तर जोपर्यंत भारत रशियाकडून खनिज तेलाची आयात बंद करत नाही, तोपर्यंत टॅरिफ हटवलं जाणार नसल्याचंही ट्रम्प यांनी स्पष्ट केलेलं आहे.**

डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयामुळे अमेरिका आणि भारतामधील व्यापार संबंधात तणाव निर्माण झालेला आहे. ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या टॅरिफचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात परिणाम होत असून याचा भारताला मोठा फटका बसत असल्याचं चित्र आहे. यावरूनच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर जोरदार हल्लाबोल केला आहे. (पान २ वर)

# नाशिकमध्ये आदिवासींचा एल्गार

## ● मुंबईच्या दिशेने हजारो शेतकऱ्यांची पाऊले वळली

वृत्तसंस्था । नाशिक

प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी किसान सभेच्या वतीने पेठ, सुरगाणा, कळवण, त्र्यंबकेश्वर या भागातील आदिवासी शेतकऱ्यांचा मोर्चा नाशिकच्या दिशेने येत असून शनिवारी मोर्चा नाशिकजवळ येईल. दुसरीकडे, दिंडोरी येथे आंदोलकांनी रस्त्यावर ठिय्या दिल्याने परिसरात वाहतूक कोंडी झाली.



अखिल भारतीय किसान सभा आणि माकप यांच्या वतीने जिल्ह्यात तालुकानिहाय आंदोलन सुरू आहे. आंदोलनाचा प्रभाव आदिवासी तालुक्यांमध्ये अधिक्याने दिसून आला. सुरगाणा, पेठ, त्र्यंबकेश्वर हे तीन तालुके टंचाईग्रस्त आहेत. या भागातील पश्चिमवाहिनी नद्या आणि उपनद्यांवर मोठ्या आकाराचे बंधारे बांधून त्यांचे पाणी स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतीला द्यावे, वनपट्टेधारकांचे क्षेत्र ४० आरपेक्षा कमी असल्याने शासकीय योजनांचे लाभ घेता येत नाहीत. त्यामुळे कब्जे वहिवाटीतील चार हेक्टरपर्यंतच्या क्षेत्राची मोजणी करून भूखंड मंजूर करावा, त्याचा सातबारा तयार करावा, अपात्र वनदाव्यांची फेरचौकशी करून दावे पात्र करणे, वनपट्टेधारकांच्या कृषिमालाची हमीभावाने खरेदी करणे आदी मागण्यांकडे आंदोलनातून लक्ष वेधण्यात आले.

दिंडोरी तहसील कार्यालयासमोर दोन दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. आंदोलकांनी चौफुली परिसरात ठिय्या दिल्याने वाहतूक खोळंबली. पर्यायी रस्त्याने वाहतूक वळविण्यात आली आहे. वाहने संथपणे पुढे सरकत आहेत. आंदोलकांनी आपल्या सोबत आंदोलनाला लागणारा वेळ लक्षात घेता अन्न, धान्य घेतले आहे. काही वाहने, सरपण आदी सामान घेत मजल दरमजल करत हा मोर्चा पायी नाशिकच्या दिशेने सरकत आहे.

**➤ शनिवारी दिंडोरी, त्र्यंबकेश्वरसह अन्य भागातुन आदिवासी बांधव नाशिकच्या वेशीवर धडकतील. नाशिकमार्गे मोर्चेकरी मुंबईकडे प्रस्थान करणार असून तीन फेब्रुवारी रोजी मोर्चेकरी मुंबईत धडकतील, असे माजी आमदार जीवा पांडू गावित यांनी सांगितले. दरम्यान, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या सोबत बैठक पार पडली आहे. स्थानिक पातळीरचे प्रश्न येथे सुटतील मात्र राज्यस्तरावरील प्रश्न मुंबईत सोडवले जातील असेही गावीत यांनी स्पष्ट केले.**

# जामनेरला 'कोका-कोला' प्रकल्प उभारणार!

वृत्तसंस्था । दावोस

**दावोस (स्वित्झर्लंड) येथील जागतिक पातळीवरील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आक्रमक आणि प्रभावी प्रयत्न केले. या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम म्हणून प्रसिद्ध शीतपेय कंपनी कोका-कोलाचा प्रकल्प जामनेर तालुक्यात उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**



मुख्यमंत्री फडणवीस यांनी दावोस (स्वित्झर्लंड) येथील जागतिक पातळीवरील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये विविध आंतरराष्ट्रीय उद्योग समूहांच्या प्रमुखांशी थेट संवाद साधत महाराष्ट्रातील उद्योग स्नेही धोरणे, मजबूत पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ आणि गुंतवणुकीसाठी उपलब्ध असलेल्या संधींची माहिती दिली. या दरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी कोका-कोला कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष मायकल गोल्टझमन यांची भेट घेऊन जामनेर येथील प्रस्तावित प्रकल्पावर सविस्तर चर्चा केली. या चर्चेत प्रकल्पासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, गुंतवणुकीचा आराखडा, रोजगार निर्मिती आणि स्थानिक विकास यासह विविध मुद्द्यांवर सकारात्मक सहमती झाली. तसेच प्रकल्पावर अधिकृतपणे शिक्कामोर्तबही करण्यात आले.

नव्या गुंतवणुकीमुळे महाराष्ट्रात नाशिक विभागातील औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असून, एकूण सात लाख ३० हजार १०० कोटी रुपयांची गुंतवणूक नाशिक विभागात होणार आहे. या भरीव गुंतवणुकीपैकी एक महत्त्वाचा आणि चर्चेचा कोका-कोला प्रकल्प जामनेर तालुक्यात साकारणार आहे. त्यामुळे जामनेर तालुका औद्योगिक नकाशावर ठळकपणे समोर येणार आहे. या ऐतिहासिक निर्णयावर प्रतिक्रिया देताना जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी समाज माध्यमावर ऐतिहासिक दिवस : जामनेरच्या औद्योगिक विकासाची दावोसमध्ये मुहूर्तमेढ, अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या. कोका-कोला सारख्या जागतिक दर्जाच्या (पान २ वर)

## छगन भुजबळ यांची महाराष्ट्र सदन घोटाळ्यातून मुक्तता


वृत्तसंस्था । नाशिक



राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते छगन भुजबळ यांच्यासाठी आजचा दिवस दिलासादायक ठरला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्यावर टांगती तलवार असलेल्या कथित महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने त्यांची निर्दोष मुक्तता केली आहे.

# गुटखाबंदीसाठी स्वतंत्र कायदा करणार : मंत्री नरहरी झिरवाळ

वृत्तसंस्था । मुंबई



**महाराष्ट्रात गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांवर पूर्ण बंदी घालण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात येणार आहे. गुजरातमध्ये लागू असलेल्या दारूबंदी कायद्याच्या धर्तीवर यासंदर्भात अभ्यासाअंती आवश्यक प्रस्ताव सादर करून कायद्याचा मसुदा तयार करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले.**

गुटखा व प्रतिबंधित अन्नपदार्थांवरील कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आढावा बैठक झाली. या बैठकीस वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे प्रधान सचिव धीरज कुमार, अन्न व औषध प्रशासन आयुक्त श्रीधर दुबे पाटील यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यात गुटखा व प्रतिबंधित अन्नपदार्थांची अवैध विक्री रोखण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात अन्न व औषध प्रशासन व गृह विभागाच्या संयुक्त पथकाची स्थापना करण्याचे तसेच अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांविरोधात कोका अंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव मांडल्याचे सांगितले.

त्याच पार्श्वभूमीवर गुजरातच्या दारूबंदी कायद्याच्या धर्तीवर गुटखाबंदीसाठी स्वतंत्र कायदा तयार करून तो येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडण्याचे निर्देश मंत्री झिरवाळ यांनी दिले. (पान २ वर)

# ई-मोजणी २.० की ई-डोकेदुखी ?

## भूमिअभिलेख विभागाच्या यंत्रणेने नागरिक त्रस्त

वृत्तसंस्था । पुणे

**राज्यात दरमहा सुमारे अडीच ते पावणेतीन लाख नागरिक जमिनीच्या मोजणीसाठी अर्ज करतात. यामध्ये हद्द कायम करणे, बिनशेती करणे किंवा दोन प्लॉटचे एकत्रीकरण करणे अशा कामांचा समावेश असतो. ही प्रक्रिया ऑनलाइन करण्यात आली असली, तरी कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करताना पोर्टलवर अनेक तांत्रिक अडचणी येतात.**



दोन- तीन महिन्यांनी अर्ज फेटाळला जातो. नागरिकांनी सर्व कागदपत्रे जोडली, तरी दोन ते तीन महिन्यांनी कागदपत्रे अपुरी असल्याचे कारण देऊन भूमिअभिलेख विभागाकडून अर्ज निकाली काढला जातो. विशेष म्हणजे त्रुटी दुरुस्त करण्याची संधी देण्याऐवजी नागरिकांना पुन्हा पहिल्यापासून नवीन अर्ज करण्यास सांगितले जाते.मोजणीसाठी आकरबंद, फाळणीबारा, महापालिकेकडून तात्पुरते आरेखन मंजूर केल्याचा नकाशा, बांधकाम सुरू करण्याचा दाखला, बिनशेती दाखल असे सर्व कागदपत्रे अर्जासोबत प्रत्येक वेळेस सांगितलेल्या प्रमाणे जोडली, तरी देखील अर्ज बाद होत आहे. प्रत्येक वेळी कागदपत्रे अपुरी, असे कारण पुढे केले जात आहे.

### ● ई-मोजणी २.०

याविषयी माहिती देताना नागरी हक्क संस्थेचे अध्यक्ष सुधीर कुलकर्णी म्हणाले, ई मोजणी व्हर्जन २ मुळे मोजणी प्रक्रियेला गती असल्याचा दावा भूमिअभिलेख विभाग करीत असला, तरी प्रत्यक्षात नागरिकांना अनेक अडचणी येतात. ऑनलाइन अर्ज करण्याच्या सुविधेत पैसे किती भरावयाचे, याचा ऑप्शन येत नाही. त्यामुळे मोजणी खात्याच्या अधिकाऱ्याला जाऊन विचारावे लागते.

## संपादकीय

### युनोतील सुधारणा

युनो म्हणजेच संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेतील सुधारणा गरजेच्याच नाही तर अत्यावश्यक असल्याचे मत युनोचे सरचिटणीस एन्टोनिया गुटेरस यांनी पुन्हा एकदा व्यक्त केल्याने विद्यमान अशांत जागतिक वातावरणाच्या पार्श्वभूमीवर हा विषय पुन्हा चर्चेला येणे क्रमप्राप्त आहे. एकीकडे जागतिक टॅरिफ पॉलिसीच्या निमित्ताने अमेरिका आपला आर्थिक दहशतवाद पसरू पाहात आहे, दुसरीकडे रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध थांबायचे नाव घेत नाही. त्यातच अमेरिकेने इराणवर हल्ला करण्याचे संकेत दिले आहेत आणि ग्रीनलँडसारख्या छोट्या देशावरही आपली नजर ठेवली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष आणि अस्वस्थता कायम आहे. बांगलादेशमध्ये अस्वस्थता आणि अशांती कायम आहे. पॅलेस्टाइन आणि इस्त्रायल यांच्यातील संघर्ष तर कधीच थांबणार नाही अशी लक्षणे दिसत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर जागतिक शांततेसाठी निर्माण करण्यात आलेली युनो ही संघटना आणि या संघटनेची महत्त्वाची उपसंघटना असलेली सुरक्षा परिषद काय करते हे ठरवणे निश्चितच महत्त्वाचे आहे. अमेरिकेने यापूर्वीच आपला युनोशी संबंध तोडून टाकला आहे, युनो आमच्यावर नियंत्रण ठेवू शकत नाही आणि युनोचा आमच्याशी काही संबंध नाही, असे अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक वेळा सांगितले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या कालावधीमध्ये आण्विक युद्धानंतर जागतिक पातळीवर जी असुरक्षितता निर्माण झाली होती त्या पार्श्वभूमीवर युनोसारख्या संघटनेकडून मोठ्या प्रमाणात अपेक्षा होत्या. जागतिक शांततेसाठी काम करणे हेच या संघटनेचे ध्येय होते. पण गेल्या ७५ वर्षांच्या कालावधीमध्ये जगात सर्वत्रच लष्करी संघर्ष झाले आहेत आणि ते थांबवण्यात किंवा कमी करण्यात युनोच्या सुरक्षा परिषदेला यश आलेले नाही. कारण, प्रत्येक देशाचे आपले स्वतःचे धोरण असल्यामुळे युनोचे जरी सर्व देश सदस्य असले तरी सुरक्षा परिषदेच्या व्यासपीठावर मात्र प्रत्येकाची भूमिका वेगळी असू शकते. विशेषतः सुरक्षा परिषदेचे जे पाच कायमस्वरूपी स्थायी सदस्य आहेत त्यामध्ये अमेरिका, चीन, फ्रान्स, रशिया आणि युनायटेड किंगडम यांचा समावेश आहे. पण या सदस्यांकडे नकाराधिकार असल्यामुळे जागतिक पातळीवर कोणताही विषय चर्चेला आला किंवा त्यावर निर्णय घेण्याची वेळ आली तर आपला अधिकार वापरून तो महत्त्वाचा निर्णय रोखण्याचे काम हे देश करू शकतात. जगातील इतर देशांवर अप्रत्यक्षपणे नियंत्रण ठेवण्याचे काम या पाच देशांकडून होते. पण दुसरीकडे भारतासारख्या लोकशाही देशाला मात्र युनोच्या कायमस्वरूपी किंवा स्थायी सदस्यत्वाचा मान अद्याप मिळालेला नाही. गेले अनेक वर्षे भारत याबाबत मागणी करत आहे.

# प्रजासत्ताकदिनी आशा स्वयंसेविकांचे जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन

प्रतिनिधी | जळगाव

**जिल्ह्यातील आशा स्वयंसेविकांना एनएचएम संचालकांच्या आदेशानुसार जननी सुरक्षा योजनेच्या कामाचा २०२३ पासूनचा थकीत मोबदला तातडीने मिळावा, यासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी आशा स्वयंसेविकांतर्फे प्रजासत्ताक दिनी (दि.२६) जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.**

**■ अशा आहेत मागण्या...**



जिल्ह्यातील आशा स्वयंसेविकांना एनएचएम संचालकांच्या आदेशानुसार जननी सुरक्षा योजनेच्या कामाचा २०२३ पासूनचा थकीत मोबदला तातडीने मिळावा, आरोग्यवर्धिनीच्या कामाची तपासणी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी करून या कामाचा मोबदला अदा करावा, वाघळी, तरवाडे, पातोंडा (चाळीसगाव), वरखेडी (पाचोरा) तसेच गिरड (भडगाव) या प्राथमिक आरोग्य केंद्रातील आशा सेविकांच्या व्हाऊचरला जिओ टॅग फोटो प्रिंट जोडणे बंद करून कामाचा मोबदला अदा करावा, शासन नियमानुसार आशा सेविकांना कोणत्याही स्वरूपाच्या रजा लागू नाहीत, तरीही आशा सेविकांना बाहेरगावी जायचे असल्यास नियमबाह्य रजेचा अर्ज घेण्याची पद्धत बंद करावी, आदी प्रलंबित मागण्यांसाठी हे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

आशा सेविकांच्या मागण्या आणि अन्य जिल्हास्तरीय प्रश्न सोडवावेत, यासाठी युनियन सातत्याने पाठपुरावा करीत आहे. परंतु, जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने आशा सेविकांच्या प्रश्नांकडे कायमच दुर्लक्ष केले असल्याने जिल्ह्यातील आशा स्वयंसेविकांमध्ये प्रचंड तीव्र नाराजी निर्माण झाला असल्याचा अरोप प्रसिध्दी पत्रकात करण्यात आला आहे. प्रलंबित प्रश्न सोडवावेत, या मागणीसाठी सोमवार, दि.२६ रोजी रामकृष्ण पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन करणार असून आंदोलनात जिल्ह्यातील सर्व आशा स्वयंवसेविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कल्पना भोई, सुनंदा पाटील, सुनंदा हडपे, भागीरथी पाटील, भारती नेमाडे, नम्रता पाटील, रविशा मोरे, उषा मोरे, उषा पाटील, भारती तायडे आदींनी केले आहे.

# नशिराबाद टोलनाक्याजवळ अपघात; तरुणीचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी | जळगाव

जळगावकडून भुसावळकडे जाणाऱ्या कारच्या चालकाचा ताबा सुटल्याने कार महामार्गावरील दुभाजक तोडून थेट विरुद्ध दिशेने येणाऱ्या कंटेनरवर आदळली. या अपघातात एका तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना नशिराबादजवळील टोल नाक्याजवळ २२ रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास घडली. या अपघातात कार चालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर गोदावरी फाउंडेशनचे रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

जळगावकडून भुसावळकडे जाणारी इनोव्हा कार (एमएच १९, बीयू- ७१८६) चा गुरुवारी रात्री ८.३० च्या सुमारास जळगाव ते भुसावळ महामार्गावरील नशिराबादजवळ भीषण अपघात झाला. दरम्यान, चालकाचा ताबा सुटल्याने इनोव्हा कारने महामार्गावरील डिव्हायडर तोडत थेट विरुद्ध दिशेने जाऊन समोरून येणाऱ्या कंटेनर (जीजे ०१, डीएक्स-९४९७) ला जबर धडक दिली. या भीषण अपघातात इनोव्हा कारमध्ये असलेल्या झोया नदीम पठाण (वय २२) या महिलेचा जागीच मृत्यू झाला. तर भुसावळ येथील सोना डेअरीचे संचालक यांचा मुलगा अरबाज खान (वय-२६) हा गंभीर जखमी झाला आहे. गंभीर जखमी असलेल्या अरबान खान यास तातडीने उपचारार्थ गोदावरी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, हा अपघात इतका जबर होता की, यात इनोव्हा कारचा पुढील भागाचा पूर्णपणे चुराडा झाला आहे. या घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

# जळगावला एटीएस सेंटर सुरु करा!

## ● वीर सावरकर रिक्षा युनियनची मागणी

प्रतिनिधी | जळगाव

**जिल्ह्यात ऑटोमेटेड व्हेईकल फिटनेस टेस्टिंग सेंटर नसल्यामुळे व्यावसायिक वाहनधारकांना फिटनेस प्रमाणपत्रासाठी नाशिक किंवा छत्रपती संभाजीनगरला जावे लागत आहे. त्यामुळे इंधन, टोल, वेळ व व्यवसायाचे फार मोठे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे लवकरात लवकर जळगावात एटीएस सेंटर सुरु करावे, अशी मागणी वीर सावरकर रिक्षा युनियनतर्फे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.**

जिल्हाधिकारी व प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना हे निवेदन देण्यात आले. निवेदन देतेवेळी, युनियनचे जिल्हाध्यक्ष दिलीप सपकाळे, वाल्मिक सपकाळे, रमेश सोनार, शशिकांत जाधव, शांताराम पाटील, एकनाथ बारी, विलास ठाकूर, सागर सोनवणे, अर्जुन पवार, सुरेंद्र सपकाळे, संजय पाटील, रामचंद्र अढागे, रवींद्र कोळी, अभिजित बाविस्कर, मोहसीन शेख, संजय चौधरी, दिनकर ठाकरे, संदीप कुमावत, शिवाजी नाते, दीपराज देवरे, पोपट ढोबळे, महेंद्र ठाकूर, मनोहर चौधरी, निलेश पाटील, नितेश देवरे,संभाजी पाटील, अमोल तायडे, किरण पाटील, अजय पाटील उपस्थित होते.

# एसएसडी म्युझिकल पार्टी, बाबा गुरुदासराम बालक मंडळाने सादर केलेल्या भजनांमध्ये रमले भाविक

प्रतिनिधी | जळगाव

**शहनशाह सद्गुरू साई सतरामदास साहेब यांचा ११६ वा वर्सी महोत्सव गणपती नगरातील संत सतराम धाम येथे सुरू आहे. शुक्रवार, दि.२३ रोजी सत्संग, भजन सादर करण्यात आले. सायंकाळी ५.३० वाजता महिला मंडळाचा सत्संगाचा तर रात्री ९ वाजता नाम सिमरन व एसएसडी म्युझिकल पार्टी आणि बाबा गुरुदासराम बालक मंडळातर्फे भजनांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.**



शनिवार, दि.२४ रोजी ५१ तासांच्या अखंड धुनी साहेबची भोग (समाप्ती) होणार आहे. रात्री ९ वाजता नाम सिमरन व एस.एस. डी म्युझिकल पार्टीद्वारे शहनशाह सद्गुरू संत सतरामदास साहेब यांच्या जीवनावर आधारित भजनांचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर रात्री १० वाजता अखंड धुनी साहेबचा समारोपचा कार्यक्रम होईल. त्यानंतर परिसरातील लहान मुले संत सतरामदास साहेब यांच्या जीवनावर आधारित नाटिका सादर करणार आहेत. तसेच रात्री




९ वाजेपासून समाजबांधवांसाठी महाप्रसाद वाटपाला सुरूवात होणार आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन साई सतरामदास ट्रस्ट व साई सतरामदास परिवारातर्फे करण्यात आले आहे. यशस्वीतेसाठी चेतनदास कारडा, इंदरलाल परसवानी, शंकरलाल पाहूजा, राजेश भक्तांनी, सुरेश गलानी यांच्यासह बाबांचे सर्व सेवेकरी परिश्रम घेत आहेत.

शनिवार, दि.२४ रोजी होणाऱ्या कार्यक्रमात सर्व समाजबांधवांनी सहभागी होवून संतांचे आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन संत सतरामदास परिवाराकडून करण्यात आले आहे.

## पान १ वरुन

**कोणत्याही प्रवर्गातील......**

झाले आहे. महापौरपदासाठी गुरुवारी निघालेल्या आरक्षण सोडतीनंतर यावर शिक्कामोर्तब झाले. स्पष्ट बहुमत असल्यामुळे भाजपमधील सर्वच महिला उमेदवारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण आहे. असे तरी मुंबई महापालिकेत ५० टक्क्यांपेक्षा अधिक नगरसेविका निवडून येण्याची परंपरा यावेळीही कायम आहे. यंदा मुंबई महापालिकेवर सर्व राजकीय पक्षांच्या मिळून तब्बल १३० नगरसेविका निवडून आल्या आहेत. एकूण २२७ प्रभागांपैकी ११४ प्रभाग महिलांसाठी राखीव असताना यंदा १३० महिला निवडून आल्या आहेत. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या विविध समित्या आणि विशेष समित्यांमध्येही महिलांना त्याच प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळणार आहे.

**पोषण आहारात केळीचा......**

दर्जा मिळाल्यामुळे नवीन उद्योगांना मोठी संधी उपलब्ध झाली आहे. हा दर्जा मिळविण्यासाठी उद्योजक, लोकप्रतिनिधी आणि शासन यांचे संयुक्त प्रयत्न कारणीभूत ठरले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांनीही मोलाचे सहकार्य केले, असे पालकमंत्री पाटील म्हणाले. यावेळी खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, उद्योग संचालक वृषाली सोनी, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष गवळी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. नवीन प्रकल्प आणण्यासाठी प्रयत्न- जिल्ह्यात नवीन लहान मोठे उद्योग उभारले गेले तर युवकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल. उद्योजक समाधानी तर जिल्हा समाधानी आणि उद्योग क्षेत्राचा विकास झाला तर जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होईल. त्यामुळे यापुढील काळात दर तीन महिन्यांनी उद्योजक व लोकप्रतिनिधींची संयुक्त बैठक घेण्यात येईल, असे पालकमंत्री पाटील म्हणाले. खासदार स्मिता वाघ यांनी उद्योजकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे सांगत जळगाव विमानतळावर कार्गो सेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. आमदार सुरेश भोळे यांनी उद्योजकांच्या अडचणी सोडवून नवीन प्रकल्प आणण्यासाठी प्रयत्न केले जातील, तसेच औद्योगिक सुरक्षेसाठी अद्यावत अग्निशमन यंत्रणा उभारण्यावर भर देणार असल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी जळगाव जिल्ह्यातील उद्योग व व्यवसायाच्या विकासासाठी प्रशासनाच्या वतीने स्वतंत्र माहिती कक्ष सुरू करण्यात येणार असल्याची माहिती दिली. या माहिती कक्षाच्या माध्यमातून बेरोजगार युवकांना नोकरीच्या संधी, स्वयंरोजगार, नवीन उद्योग उभारणी, शासकीय योजना तसेच प्रशिक्षणाबाबत सविस्तर मार्गदर्शन देण्यात येणार आहे. प्रशिक्षित युवकांना उपलब्ध रोजगाराच्या संधी तसेच उद्योजकांना व्यवसायवृद्धीसाठी आवश्यक माहिती एकाच ठिकाणी मिळावी, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उद्योग सहसंचालक वृषाली सोनी यांनी प्रास्ताविकात निर्यात कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. या दरम्यान, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या चार मालवाहू ई-रिक्षांचे वितरण पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

**अमेरिकन टॅरिफमुळे......**

राहुल गांधी यांनी एक्सवर एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये राहुल गांधी हे एका कापड उद्योगाला भेट देत माहिती जाणून घेत असल्याचं दिसत आहे. यावर भाष्य करत अमेरिकन टॅरिफमुळे भारतातील ४.५ कोटींपेक्षा अधिक नोकऱ्या आणि लाखो व्यवसाय धोक्यात असल्याचा दावा करत यासाठी फक्त पंतप्रधान मोदी हेच जबाबदार असल्याचा आरोप राहुल गांधींनी केला आहे. तसेच राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा भारताच्या अर्थव्यवस्थेला मृत अर्थव्यवस्था असं संबोधलं आहे. राहुल गांधी काय म्हणाले? - सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील (ट्विटर) पोस्टमध्ये राहुल गांधींनी म्हटलं की, ५० टक्के अमेरिकन टॅरिफ आणि अनिश्चितता यामुळे भारतातील कापड निर्यातदारांचं मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अनेकांनी नोकऱ्या गमावणं, उद्योग व्यवसायाचे कारखाने बंद होणं आणि ऑर्डरमध्ये घट ही आपल्या मृत अर्थव्यवस्थेची वास्तविकता आहे. यामध्ये पंतप्रधान मोदींनी कोणताही दिलासा दिलेला नाही किंवा अमेरिकन टॅरिफबाबत काहीही प्रतिक्रिया दिलेली नाही, जेव्हा ४.५ कोटींपेक्षा अधिक नोकऱ्या आणि लाखो व्यवसाय धोक्यात आहेत. पण या सर्व गोष्टींना फक्त मोदी तुम्हीच जबाबदार आहात, कृपया याकडे लक्ष द्या, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

**गुटखाबंदीसाठी स्वतंत्र......**

झिरवाळ म्हणाले, राज्यात गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांच्या उत्पादन, वितरण व विक्रीवर बंदी आहे. अवैध व्यवहारावर अधिक कठोर कायदेशीर कारवाईसाठी गुटखा विक्रेत्यांवर मकोका लागू करण्याबाबत कायद्यात आवश्यक दुरुस्त्या करून गुटखा व्यवसायाशी संबंधित गुन्ह्यांनाही कोकाच्या कक्षेत आणण्यासाठी कायदा अधिक कठोर केला जाणार आहे. विशेषतः शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात अशा प्रतिबंधित पदार्थांची विक्री होत असल्यास त्यावर तातडीने आणि कठोर कारवाईचे निर्देश देण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

**जामनेरला 'कोका-कोला'......**

कंपनीचा प्रकल्प जामनेरमध्ये येणे ही संपूर्ण तालुक्यासाठी आणि जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. तालुक्यातील अनेक तरुणांना स्थानिक पातळीवरच हक्काचा रोजगार मिळणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. दावोस येथील बैठकीनंतर कोका कोला प्रकल्प जामनेर तालुक्यात प्रत्यक्षात आकारास आल्यावर केवळ औद्योगिक विकासच नव्हे तर संपूर्ण जळगाव जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीला नवी दिशा मिळणार आहे. मोठ्या प्रमाणावर थेट व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल. वाहतूक, लॉजिस्टिक्स, पॅकेजिंग, सेवा उद्योग यांसारख्या पूरक क्षेत्रांनाही चालना मिळणार आहे. तसेच या प्रकल्पाच्या निमित्ताने रस्ते, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, दळणवळण आणि इतर मूलभूत पायाभूत सुविधांचा विकास वेगाने होणार आहे. याचा लाभ स्थानिक नागरिक, शेतकरी आणि लघु उद्योजकांनाही मिळणार आहे. एकूणच, दावोस वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममधील या यशस्वी चर्चांमुळे महाराष्ट्रात गुंतवणुकीचा नवा अध्याय सुरू होत असून, जामनेर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार आहे.

# पालिवाल समाज महिला मंडळातर्फे विविध कार्यक्रमांनी संक्रांत साजरी



प्रतिनिधी | नाशिक

**येथील पालीवाल समाज महिला मंडळाच्यावतीने संक्रांतीनिमित्त हळदी-कुंकू, वाण वितरण, खेळाचे मनोरंजक कार्यक्रम तसेच पतंग महोत्सव साजरा करण्यात आला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजया पालिवाल होत्या. त्यांच्याहस्ते मंडळाच्या सल्लागार किरण पालिवालद्वारा मुद्रित हिंदी-मराठी आरती संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी समाजातील दिवंगत स्व.कुसुमताई पालिवाल, छोटूसिंहजी मंडलोई, स्व.महेंद्र पालिवाल, स्व.ललेशभाई कानूनगो आदींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ज्योती पालिवाल यांच्या निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आगामी काळात राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांवर चर्चा करण्यात आली.

# तक्रारीचे निरसन होईपर्यंत मीटर बदलू नये; कुसुंबा ग्रामपंचायतीचा ठराव

प्रतिनिधी | जळगाव

**स्मार्ट मीटर विषयी मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त असून या विषयी जनतेमध्ये उद्रेक झालेला आहे. त्यामुळे तक्रारींचे निरसन होईपर्यंत वीज कनेक्शनचे मीटर बदलण्यात येवू नये, असा ठराव कुसुंबा ग्रामपंचायतीच्यावतीने पारीत करण्यात आला असून या ठरावाची प्रत महावितरणच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली.**



महावितरणकडून स्मार्ट मीटर बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. मात्र, हे स्मार्ट मीटर बसविण्याला कुसुंबेकरांनी विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे तक्रारी दाखल केल्या असून या तक्रारींची दखल घेवून कुसुंबा ग्रामपंचायतीकडून नुकताच स्मार्ट मीटर न बसविण्याबाबत ठराव करण्यात आला. तसेच या ठरावाची प्रत महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे देण्यात आली.

प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात, वेळोवेळी विजेचा होणारा लपंडाव व अवाजवी वाढीव बील हे विरोधाचे मुख्य कारण आहे तसेच संबंधित ठेकेदाराची माणसे ग्राहकांना मीटरमध्ये छेडछाड आहे, अशी भिती दाखवून पैसे उकळत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी**

महावितरणने गावातील नवीन ट्रान्सफार्मर, विजेचे खांब व केबलचे काम पूर्ण करुन विजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी देखील ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे. यावेळी सरपंच अशोक पाटील, उपसरपंच चंद्रकांत पाटील, रामदास कोळी, भुषण पाटील, विशाल राणे, प्रमोद घुगे उपस्थित होते.

# शाश्वत उपाय हे उज्ज्वल भवितव्याची गुरूकिल्ली : व्ही.के. सिंग

## ● विद्यापीठात बोध, मानवी बुद्धिमत्ता आणि कृत्रिम बुद्धिमत्तावर आंतरराष्ट्रीय परिषदेला प्रारंभ

प्रतिनिधी | जळगाव

**कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे जग बदलत असून आपले जीवन जसे वेगाने बदलत आहे. कृत्रिम बुध्दीमत्ते संदर्भात माहिती, तयारी, योग्य वापर, मानव केंद्रीत तंत्रज्ञान, शाश्वत उपाय हे उज्वल भवितव्याची गुरूकिल्ली आहे असे, मत भारत सरकारच्या नीती आयोगाचे वरिष्ठ सल्लागार व्ही.के. सिंग यांनी व्यक्त केले.**



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा व पीएम उषा अंतर्गत 'बोध, मानवी बुद्धिमत्ता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले असून या परिषदेचे उद्घाटन शुक्रवार दि.२३ रोजी पार पडले. याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे होते तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव प्रा.मनीष जोशी, वडोदरा येथील जीएसएफसी विद्यापीठचे कुलगुरू प्रा.जी.आर. सिन्हा, प्रा.बी. व्ही. पवार, आंतरराष्ट्रीय परिषदेचे मुख्य संयोजक तथा संगणक शास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.राकेश रामटेके, प्रा.एस.आर. कोल्हे, सचिव डॉ.अजय सुरवाडे, समन्वयक डॉ.राम भावसार आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना प्रा.सिंग यांनी कृत्रिम बुध्दीमत्तेबाबत संधी, आव्हाने, धोके याबाबत विस्तृत मांडणी केली. तसेच भारतात होत असलेल्या वेगवेगळ्या संशोधना संदर्भात आणि एआय बाबत सद्यस्थितीतील त्यांनी माहिती दिली. कृत्रिम बुध्दीमत्ता (एआय) तंत्रज्ञान प्रचंड संधी निर्माण करत असतांना नवीन आव्हाने, धोके देखील निर्माण करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एआय मुळे रोजगारावर परिणाम होत असला तरी नवनवीन संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होत असून एआय बाबतीत साक्षर होणे ही काळाची गरज आहे. एआय वापरायला प्रचंड विद्युत उर्जा लागते ही चिंतनीय बाब आहे. एआयचा वापर योग्य पध्दतीने व नैतिकतेने होणे गरजेचे आहे. कारण डिपफेक तसेच इतर पध्दतीने गैरवापर होत असल्याचे समोर येत आहे. एआयवर शाश्वत उपाय शोधणे हे देखील महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# देशप्रेमाच्या वज्रमुठीसाठी आजही वंदे मातरम् गरजेचे : श्रीकांत नेवे

प्रतिनिधी । चोपडा

**स्वातंत्र्यपुर्व काळात 'वंदे मातरम्' या मंत्राने संपुर्ण जाती धर्म विरहित भारतीय समाजाची एकजूट केली.त्यामुळे निर्माण झालेल्या वज्रमुठीमुळे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मोठी भुमिका पार पाडली. देश स्वतंत्र झाला. परंतू आज भारतात समाज वेगवेगळ्या कारणांनी दुंभगला गेल्याचे चित्र आहे. भारताला वेगाने प्रगती साधण्यासाठी विषमता संपविण्यात आजही 'वंदे मातरम्' मंत्र उपयुक्त ठरू शकतो. त्यामुळे शासन वंदे मातरमची १५० वा वर्धापन दिन साजरा करीत आहे.त्याच्या प्रेरणा प्रत्येकाने घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन पत्रकार श्रीकांत नेवे यांनी केले.**




निमगव्हाण ता.चोपडा येथील दादाजी दरबारच्या सभागृहात भगिनी मंडळ संचलित कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या रा.से.योजना विभागाच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिरांत 'वंदे मातरम्@१५०' या विषयावर नेवे बोलत होते.अध्यक्षस्थानी कार्यक्रम अधिकारी प्रा.अनिल बाविस्कर होते. प्रारंभी जेष्ठ पत्रकार चंद्रकांत पाटील यांनी सोशल मिडीया व पत्रकारिता या विषयावर आपले मनोगत व्यक्त करतांना सोशल मिडीया पेक्षा वृत्तपत्रातील लिखाणाला विश्वासार्हता अधिक असते. सोशल मिडीया मुळे जग खूपच जवळ आले आहे. त्यामुळे घडीत घटना वेगाने सर्वत्र पोहचण्यात मदत होते. मिडीयाच्या वापराचा फायदा देशाच्या प्रगतीसाठीही होत आहे असे मत मांडले. यावेळी कार्यक्रम अधिकारी प्रा.अनिल बाविस्कर व सह कार्यक्रमाधिकारी प्रा.पाटील यांनी वक्त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी शिबिरार्थी विद्यार्थी व विद्यार्थीनी हजर होते.

## जसाने गावातील सुपुत्र चि.चेतन पवार, केंद्रीय राखीव पोलीस दलाचे प्रशिक्षण पुर्ण केल्याबद्दल मिरवणूक सोहळा



प्रतिनिधी । शिंदखेडा

**लहानपणीच पितृ छत्र हरपलेल्या चि.चेतन पवार जसाने.ता.शिंदखेडा या छोटाश्या खेडेगावातील प्रतिकूल परिस्थितीला मात देत जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाने केंद्रीय राखीव दलात भरती होणं म्हणजे खरचं कौतुकास्पद..! त्याचा या देदीप्यमान यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

चि.चेतन पवार याचे प्राथमिक शिक्षण जसाने गावाच्या जिल्हा परिषद शाळेत झाले नंतर माध्यमिक शिक्षणासाठी रंजाणे गावातून पुर्ण केले.पदवी पर्यंतचे शिक्षण हे एस.एस.व्हि. पी.एस कॉलेज शिंदखेडा येथे पुर्ण केले. सहा वर्षाच्या अंथाग परिश्रम घेऊन कुठल्याही प्रकारचे सैन्यपुर्व प्रशिक्षण न घेता स्वताच्या मेहनतीने यश मिळवले या यशात चि.चेतनची आई आरस्तोल बाई पवार व भाऊ राहुल पवार यांची खंबीर साथ लाभली. संघर्ष के दौरान इन्सान अकेला होता है परंतु या संघर्षात चि.चेतनची आई व भाऊ ही होते.दि २० तारखेला जसाणे गावातून मित्रपरिवार व जवळचे नातलग ,गावातील सर्व समाजबांधव यांनी आगमण सोहळा व मिरवणूक काढून चि.चेतन चे अभिनंदन केले.देशात शिस्तप्रिय पिढी तयार करायची असेल तर शिस्तीचे धडे हे शालेय जीवनातचं द्यायला हवे देशाच्या सेवेसाठी प्रत्येक कुंटुबीयांनी एक जण तरी सैन्य दलात भरती करावा.

## थोडक्यात

### नंदुरबार येथे आज मोफत नेत्र तपासणी शिबिर

**नंदुरबार ।** गंगामाई बहुउद्देशीय महिला मंडळ चोपडा व कांतालक्ष्मी शहा नेत्र रुग्णालय नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ जानेवारी रोजी मोफत डोळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले आहे. दि. २४ जानेवारी रोजी सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत नेहरू नगरातील जेष्ठ नागरिक सभागृहात हा कार्यक्रम होणार असून शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन गंगामाई बहुउद्देशीय महिला मंडळाच्या सचिव हेमलता चौधरी यांनी केले आहे.

### जनता पार्क परिसरात पेव्हर ब्लॉकचे काम पूर्ण

**नवापूर ।** शहरातील जनता पार्क परिसरात असलेल्या नाना नाणी पार्कमधील कपालेश्वर महादेव मंदिर परिसरात भाविकांना भेडसावणाच्या गैरसोयीदूर करण्याच्या दृष्टीने पेव्हर ब्लॉक बसवण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. हे संपूर्ण काम नगरसेवक भालचंद्र गावित यांच्या सहकार्याने व स्वखर्चातून करण्यात आल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. या पार्श्वभूमीवर मंदिर परिसर सुशोभित करून स्वच्छ व सुरक्षित करण्याच्या हेतूने पेव्हर ब्लॉक बसवण्याचा निर्णय घेण्यात आला. काम पूर्ण झाल्यानंतर मंदिर परिसर अधिक स्वच्छ, सुबक व आकर्षक दिसू लागला असून भाविकांना आता आरामदायी वातावरणात दर्शन घेणे शक्य झाले आहे. या विकासकामामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांना आता मंदिरात ये-जा करणे अधिक सोयीचे झाले आहे.

### जिल्ह्यात जलसेवा आंकलन उपक्रम

**धुळे ।** ग्रामीण भागातील कुटुंबांना नियमित, पुरेशा प्रमाणात व गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी शाश्वतपणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन करण्यासाठी जल सेवा आंकलन या ग्रामपंचायतच्या नेतृत्वाखालील मूल्यांकन साधनाचे कार्यान्वयन करण्यात आले आहे. जानेवारी महिन्यात होणा-या ग्रामसभांमध्ये हा उपक्रम पार पडणार आहे. जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांचे कार्यक्षमता मूल्यांकन ठराविक कालावधीत तृतीय पक्ष सर्वेक्षणांद्वारे करण्यात येते. मात्र, गावपातळीवरील पाणी सेवांसाठी सतत, स्थानिक मालकीची व पारदर्शक देखरेख यंत्रणा संस्थात्मक करणे आवश्यक असल्याने जल सेवा आंकलन या अभिनव उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

## एस.एम.टी. इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन पॅन इंडिया सिनेमा थीमवर सांस्कृतिक कार्यक्रम



प्रतिनिधी । गलंगी,ता.चोपडा

एस.एम.टी. इंग्लिश मिडीयम स्कूल, होळनांथे ता.शिरपूर, जि.धुळे येथे शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाले.

वार्षिक बक्षीस वितरण समारंभ, तर भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वर्षीच्या सांस्कृतिक कार्यक्रमाची विशेष आकर्षण ठरलेली पॅन इंडिया सिनेमा ही संकल्पना. या थीमनुसार विद्यार्थ्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीतील ऐतिहासिक, सांस्कृतिक व प्रेरणादायी प्रसंग सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमाची सुरुवात थाळनेर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या शुभहस्ते ऑनलाइन पद्धतीने उद्घाटन करून करण्यात आली. उद्घाटनप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाबरोबरच शिस्त, नैतिक मूल्ये व सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन प्रा. संजय पाटील, संस्थेचे मार्गदर्शक डायरेक्टर ॲड. सुनील भोई, तसेच शाळेचे प्राचार्य डॅनी सायरस यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये -केजीएफ चित्रपटातील रॉकी भाईचा थरारक फायटिंग सीन, छावा चित्रपटावर आधारित छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित नाट्य व नृत्य सादरीकरण झाले. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा अत्यंत प्रभावीपणे साकारण्यात आला. याशिवाय, प्रांजल एल.के.जी. वर्गातील विद्यार्थ्यांनी प्रांजलच्या आवाजावर सादर केलेला नृत्याविष्कार हे कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरले. तसेच शिवतांडव या गीतावर आधारित सादरीकरण प्रेक्षकांच्या अंगावर अक्षरशः शहारे आणणारे ठरले. याचबरोबर भूलभुलैया चित्रपटातील माजुलिका या व्यक्तिरेखेचा अभिनय सादर करत विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांकडून भरभरून दाद मिळवली. कार्यक्रमामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली कला सादर केली. विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणाचे उपस्थित मान्यवरांनी भरभरून कौतुक केले. योगेश सोनार व राम लोहार सर यांनी अत्यंत प्रभावी, शिस्तबद्ध व समन्वयपूर्ण पद्धतीने करून कार्यक्रमाच्या यशात मोलाचा वाटा उचलला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे चेअरमन प्रा. संजय पाटील यांनी समाधान व्यक्त करत सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच मार्गदर्शक डायरेक्टर ॲड. सुनील भोई यांनी शाळेच्या सांस्कृतिक व शैक्षणिक वाटचालीचे विशेष कौतुक केले.



धुळे - मतदार दिनानिमित्त आज मतदान शपथ धुळे महानगरपालिका सभागृहात घेण्यात आली. त्याप्रसंगी उपस्थित अधिकारी व कर्मचारी.

## छळास कंटाळून महिलेची आत्महत्या

प्रतिनिधी । नंदुरबार

तालुक्यातील सुतारे येथील मंजुळाबाई भिमराव पवार या महिलेशी पती भिमराव पवार व मुलगा कैलास पवार नेहमी भांडण करायचे या त्रासाला कंटाळून सुतारे गावातील शिवारात शेतातील विहिरीत उडी घेवून मंजुळाबाई पवार यांनी आत्महत्या केली. याबाबत भिमराव पवार, कैलास पवार यांच्या गुन्हा दाखल केला आहे.

## धुळे महापालिकेत हॅट्ट्रिक विजय; लोहगाव येथे सुभाष जगताप यांचा भव्य सत्कार

प्रतिनिधी । शिंदखेडा

**धुळे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक एक मधून सुभाष सुकलाल जगताप यांनी तिसऱ्यांदा सलग विजय मिळवत हॅट्रिक साधली. त्यांच्या या दणदणीत विजयाबद्दल मूळ गावी लोहगाव (ता. शिंदखेडा) येथे ग्रामस्थांच्या वतीने भव्य मिरवणूक व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.**



या मिरवणुकीत गावकऱ्यांचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांची आतषबाजी करत श्री. जगताप यांचे जंगी स्वागत करण्यात आले. त्यानंतर आयोजित सत्कार समारंभात विविध मान्यवरांनी त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन गौरव केला.

या प्रसंगी रवी कन्या माध्यमिक विद्यालयाचे चेअरमन सतीलाल पाटील, खरेदी-विक्री संघाचे माजी संचालक अशोक पाटील, माजी सरपंच महेंद्र पाटील, चिंतामण माळी, नवे कोड्याचे माजी सरपंच भैयादादा जिजाबराव पाटील, माजी उपसभापती श्यामकांत पाटील, चिलाण्याचे पंजाबराव पवार, कळगावचे माजी सरपंच हिरालाल पाटील, लोहगाव विकास सोसायटीचे चेअरमन सुनील पाटील, व्हाईस चेअरमन जगन्नाथ माळी, माजी सरपंच वसंत पाटील, ज्ञानेश्वर पाटील, ग्रामसेवक प्रफुल शिंदे यांच्यासह लोहगाव, वसमाने, कडगाव, कुंभारे व तापी परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना सुभाष जगताप यांनी मतदारांनी दिलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले व भविष्यातही धुळे शहराच्या तसेच गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रम शांततेत व उत्साहात पार पडला.

## चोपड्यात श्रीराम मंदिर वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रम

प्रतिनिधी । चोपडा



आयोध्येतील श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त चोपडा शहरातील जागृती क्लब तर्फे दोन दिवसीय सोहळा पार पाडण्यात आला.त्यामध्ये दि.२१ रोजी कैलास महाराज बलवाडी(म.प्र.) व त्यांच्या सहका-यांनी सुंदरकांड सादर करण्यात आला.

तसेच दि.२२ रोजी ह.भ.प. संजिव महाराज यांनी श्रीराम जन्मभुमी संघर्ष गाथा याविषयावर व्याख्यान पार पडले. यापुर्वी श्री गणेश जयंतीचे औचित्य साधत प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलन अ.भा. वंशावली संरक्षण एवम संवर्धन संस्थानचे अध्यक्ष परमेश्वर ब्रम्हभट्ट,माजी विधानसभाध्यक्ष अरुणभाई गुजराथी,नगरसेवक गजेंद्र जैस्वाल आदींचे हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक अनिल वानखेडे,भटू पाटील,श्याम परदेशी, श्याम सोनार, प्रवीण जैन, नगरसेवक नरेंद्र पाटील, श्रीकांत नेवे आदी सह शेकडो महिला पुरुष उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जागृती क्लबचे अध्यक्ष गिरीष भाट, उपाध्यक्ष मनोज लोहार यांच्या मार्गदर्शनाने व क्लबच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.



धुळे - आज नेताजी सुभाष चंद्र बोस व हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्ताने धुळे महानगरपालिका सभागृहात पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्याप्रसंगी उपायुक्त मनोज वाघ, लेखापाल चंद्रकांत मोरे, कार्यालयीन अधीक्षक संजय मोरे, वसुली अधीक्षक मुकेश अग्रवाल, पंकज शर्मा, पंकज सूर्यवंशी, गोकुळ ठाकूर, काळू सावळे, योगेश गोरे, मनोज चौधरी, डॉ. योगेश पाटील ,कैलास मासाळ, नंदू सोनवणे विशाल लाडे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नियोजन समितीच्या बैठकीत ४७२ कोटींच्या प्रारुप आराखड्यास मंजुरी

### २६६ कोटींच्या अतिरिक्त निधीची राज्यस्तरावर मागणी करणार : पालकमंत्री जयकुमार रावल

प्रतिनिधी । धुळे

**राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत धुळे जिल्ह्याच्या जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत २०२६-२०२७च्या २९२ कोटी १० लाख, अनुसूचित जाती योजनेअंतर्गत ३२ कोटी रुपये आणि आदिवासी उपयोजनेअंतर्गत १४८ कोटी ५६ लक्ष अशा एकूण ४७२ कोटी ६६ लाख रुपयांच्या प्रारुप आराखड्यास मंजूरी देण्यात आली. हा आराखडा मान्यतेसाठी राज्यस्तरीय समितीकडे सादर करण्यात येणार आहे.**



पालकमंत्री श्री. रावल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन नियोजन सभागृहात समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीस खा. डॉ. शोभा बच्छाव, आ. काशिराम पावरा, मंजुळा गावित, अनुप अग्रवाल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, महापालिका आयुक्त नितीन कापडणीस, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सोनार, एकात्मिक आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त संजय सैंदाणे, यांच्यासह सर्व विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

धुळे जिल्ह्याची स्वतंत्र ओळख निर्माण करून पर्यटन, उद्योग, कृषी, शिक्षण व औद्योगिक गुंतवणूक या क्षेत्रांत जिल्ह्याची सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यासाठी धुळे जिल्ह्याचा १०० दिवसांचा विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिले. जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी भौगोलिक स्थिती, राष्ट्रीय महामार्ग, रस्ते, सिंचन सुविधा, औद्योगिक वसाहती तसेच मनमाडइंदूर रेल्वे मार्गाचे विस्तारीकरण या संधींचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.बैठकीत खा. डॉ. बच्छाव, आ. पावरा, मंजुळा गावित, अनुप अग्रवाल, यांनी विविध विषयांच्या चर्चेत सहभाग घेऊन महत्वपूर्ण सुचना केल्यात.

## प्रताप विद्यामंदिरात नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती



प्रतिनिधी । चोपडा

**प्रताप शाळेत दि. २३ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती निमित्त पराक्रम दिवस साजरा करण्यात आला. सर्वप्रथम नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला मुख्याध्यापक सुनील पाटील यांच्या हस्ते माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.**

यावेळी इयत्ता चौथी अनेर मधील विद्यार्थिनी कबिरा दिनेश संदानशिव व गौरी ऋषिकेश बारी यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जीवन परिचय अगदी सहज, सोप्या शब्दात करून दिला. तसेच उपशिक्षिका रश्मी देशमुख यांनी देखील नेताजींबद्दल सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली. सूत्रसंचालन दिनेश संदानशिव व फलक लेखन मोहिनी बऱ्हाटे व निर्मल पवार यांनी केले.

# जळगाव जिल्हा



# अभिनेत्री सोनाली कुलकर्णींची ग्रामपंचायतींना भेट

## पंचायत राज अभियानांतर्गत असलेल्या विविध कामांची केली पाहणी

प्रतिनिधी । जळगाव

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत असलेल्या विविध उपक्रमांची पाहणी व प्रचार प्रसिद्धी करण्यासाठी प्रसिद्ध सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी गुरुवारी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आली होती. जिल्ह्यातील गालापूर (ता. एरंडोल) (वडगाव करे (ता. पाचोरा) व गारखेडा (ता.जामनेर )येथे सोनाली कुलकर्णींच्या प्रमुख उपस्थितीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**



ग्रामपंचायतींचे सुरू असलेलो डिजिटलायझेशन तसेच जलतारा शोषखड्डे व विविध लोकोपयोगी उपक्रमांचे उद्घाटन यावेळी करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब आकडे यांच्यासह विविध अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील या तिन्ही गावांमध्ये सोनाली कुलकर्णी यांचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित गावकऱ्यांनी दिलेली दाद पाहून सोनाली भारावून गेली होती. यावेळी गावकऱ्यांना समृद्ध पंचायत राज अभियानात उस्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन केले. जिल्ह्यातील या तिघेही ग्रामपंचायतींना भेटी दिल्यानंतर तेथील ग्रामपंचायतीने विकासाच्या दिशेने टाकलेले पाऊल पाहून सोनाली भारावली होती. यावेळी तिने जिल्ह्यातील ग्रामपंचायतींचे कौतुक केले. यावेळी उपस्थित ग्रामस्थांचे सोनालीने आभारही मानले.

**घोडा गाडीतून मिरवणूक**

**एरंडोल तालुक्यातील गालापूर येथे सोनाली कुलकर्णी हिची घोडागाडीतून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत गावकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यासोबतच शाळकरी विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकामार्फत लेझीम खेळत स्वागत करण्यात आले.**

# राधेश्याम कंडारे काव्यरत्न पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी । चोपडा

**कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे कविराज राधेश्याम अशोक कंडारे यांना काव्यरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा या मंचाच्या नाशिक शाखेच्या वतीने झालेल्या त्रिवेणी साहित्य संमेलनात काव्य वाचन तसेच काव्य रत्न पुरस्कार सोहळा पार पडला.**



कार्यक्रमाची सुरुवात साने गुरुजींच्या 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' या प्रार्थनेने करण्यात आली.

ज्येष्ठ कवयित्री हेमलता गिते यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. तद्नंतर दीपप्रज्वलन, प्रतिमा व ग्रंथ पूजन दिलीप साळुंके,धनंजय गोरे यांनी केले. तसेच शामसुंदर सोन्नर महाराज यांनी अध्यक्षस्थान ग्रहण करून संमेलनाध्यक्षीय भाषण केले. यावेळी विशेष प्रमुख पाहुणे म्हणून जयप्रकाश जातेगांवकर, रामचंद्र जंगले, संपत देवगिरे,स्वप्नील तोरणे उपस्थित होते. संमेलनाचे सूत्रसंचालन योगिता भागवतकर यांनी केले.

व्यासपीठ संयोजनाचे कार्य मिनाक्षी गवळी यांनी केले. कविराज राधेश्याम यांनी स्व: परिचय देतांना जिल्हा परिषद शाळा तसेच साने गुरुजी माध्यमिक विद्यालय वडती यांचा विशेष उल्लेख करून शास्त्रीय संगीताचे धडे श्री संत गजानन बहुउद्देशीय संस्था संचलित शिवरंजनी संगीत विद्यालय चोपडा येथे घेत आहे, असे सांगितले. व कवितेविषयी प्रेरित करण्याचे काम त्यांचे वडील अशोक कंडारे तसेच विजय पालीवाल सर करतात, असे सांगितले.

त्यांनी याठिकाणी हिवाळ्याच्या संबंधित गरिबांचा हिवाळा' हे काव्य सादर केले. पुरस्कार स्वीकारताना कविराज राधेश्याम कंडारे त्यांच्या सोबत त्यांचे ज्येष्ठ बंधू गोपाल कंडारे हे होते. कविराज राधेश्याम यांना शाल, श्रीफळ, मानपत्र, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह,तसेच पदक हे शामसुंदर सोन्नर, ग्लोबल अध्यक्षा हेमलता गिते यांच्या हस्ते 'काव्य रत्न' पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी कवी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

### श्रीरामदेवबाबा मंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त विविध कार्यक्रम

**जळगाव ।** तालुक्यातील नशिराबाद येथे असलेल्या श्री रामदेवबाबा मंदिराचा २१ वा वर्धापनदिन भक्तिभाव व उत्साहात साजरा होत आहे. यानिमित्त आयोजित माघ मेला उत्सव भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. महाराष्ट्रातील रामदेवबाबांचे अत्यंत भव्य व श्रद्धास्थान म्हणून ओळख असलेल्या या मंदिरात देशभरातून हजारो भक्त दाखल झाले आहेत. माघ मेळ्यानिमित्त होम-हवन, अभिषेक, भंडारा, चंद्रपूजन आदी विविध धार्मिक विधी व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे.

### भुसावळ पालिकेच्या स्थलांतरावरून वाद

**भुसावळ ।** भुसावळ पालिकेचे कामकाज श्री संत गाडगेबाबा रुग्णालयात स्थलांतर करण्याच्या निर्णयावरून शहरातील राजकारण तापले आहे. या निर्णयाविरोधात सोमवारी भाजपाने प्रांताधिकारी जितेंद्र पाटील यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. या आंदोलनानंतर पालिका रुग्णालयात सुरू असलेले तोडफोडीचे काम तात्पुरते थांबवण्यात आले. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)च्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी दुपारी शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेतली. पालिकेचे स्थलांतर निश्चितच होणार आहे. त्यासाठी अधिकृत ठराव केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रांताधिकारी यांच्या दालनात केलेले आंदोलन म्हणजे अधिकाऱ्यांवर टाकलेला दबाव असून हा प्रकार निषेधार्ह आहे. अशा पद्धतीने आंदोलन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

# महात्मा फुले हायस्कूलमध्ये क्रीडा महोत्सवाचे बक्षीस वितरण

प्रतिनिधी । धरणगाव



येथील महात्मा फुले हायस्कूलमध्ये सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त आयोजित क्रीडा महोत्सवातील विजेत्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. शिक्षणासोबतच खेळाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा उपक्रम आवश्यक असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक जे.एस. पवार यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून उपनगराध्यक्ष सुरेखा महाजन, विजय महाजन, विलास महाजन, नगरसेवक परमेश्वर महाजन, लक्ष्मण महाजन, हेमंत महाजन, पवन महाजन, जितेश महाजन, तेजस महाजन उपस्थित होते.

# गुणवंत विद्यार्थी हीच महाविद्यालयाची शान : ॲड. संदीप पाटील



प्रतिनिधी । चोपडा

**येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयात विविध स्पर्धा परीक्षेत निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना ॲड. संदीप पाटील म्हणाले, गुणवंत विद्यार्थी हे महाविद्यालयासह गावाची शान असतात.**

**यावेळी सीमा सुरक्षा दलामध्ये निवड झालेले निखिल नितीन कोळी, चेतन ओंकार पाटील, महेश पांडुरंग पाटील तसेच केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलामध्ये निवड झालेल्या विवेक शिरसाठ, शिवम प्रकाश ठाकरे, तुषार रमेश पाटील, दीपक रवींद्र पाटील आणि मुंबई पोलीस म्हणून निवड झालेले गौरव विजयसिंग राजपूत त्याचप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाचे सहाय्यक शिक्षक स्वप्निल सोनवणे यांनी शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी आयोजित राज्यस्तरीय संगीत स्पर्धेत चौथा क्रमांक प्राप्त केल्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सर्व गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.**

या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी ॲड. संदीप सुरेश पाटील हे उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या सचिव डॉ. स्मिता संदीप पाटील तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. के. एन.सोनवणे, उपप्राचार्य प्रा.डॉ.आर. एम. बागुल, उपप्राचार्य प्रा.डॉ. ए. बी. सूर्यवंशी, समन्वयक डॉ. शैलेशकुमार वाघ, पर्यवेक्षक ए.एन. बोरसे, रजिस्ट्रार डी. एम. पाटील, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. आर. आर. पाटील व डॉ. मुकेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष ॲड.संदीप सुरेश पाटील पुढे म्हणाले की, कठोर परिश्रम करून संघर्ष करत यशस्वी होणारे गुणवंत विद्यार्थी हीच महाविद्यालयाची शान असते. यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांनी यशाने हुरळून न जाता स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या इतर विद्यार्थ्यांनाही मार्गदर्शन करून प्रेरणा व पाठबळ द्यावे. आपल्या समाजाची व देशाची सेवा करणे ही देशभक्ती असून गुणवंत विद्यार्थी हे संस्था, महाविद्यालय, गाव, तालुका यांचा नावलौकिक वाढवतात. ही गौरवाची बाब आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. शैलेशकुमार वाघ यांनी मानले.

## धरणगाव तालुक्यात वातावरणात बदल, किरकोळ आजार बळावले

प्रतिनिधी । धरणगांव

धरणगाव शहरासह तालुक्यातील आनोरे, धानोरे, गारखेडे, पिंप्री, वाघळूद परिसरासह संपूर्ण तालुक्यात वातावरणात बदल झाला आहे. किरकोळ आजार बळावले आहेत. जिल्ह्यासह तालुक्यात यंदा थंडीचे प्रमाण अधिक होते. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे दिवसा उष्णता जाणवू लागली आहे. त्यामुळे सर्दी, खोकला, डोकेदुखीचे किरकोळ आजार नागरिकांमध्ये तसेच लहान मुलांमध्ये बळावले आहेत. दिवसा ऊन तसेच रात्री थंडी पडत असल्यामुळे बदलत्या वातावरणाचा प्रभाव नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. लहान मुलांच्या आरोग्यावर देखील ढगाळ वातावरणाचा परिणाम जाणवत आहे. दुपारी १२ वाजेपर्यंत ढगाळ वातावरण राहत असून नंतर मात्र उन्हाचे चटके बसू लागतात.

# धरणगाव येथील वाचनालयात नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील भवरलालभाऊ जैन सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाच्या वतीने भारताचे थोर स्वातंत्र्यसैनिक नेताजी सुभाषचंद्र बोस तसेच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती आदरभावाने व उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस माजी नगरसेवक नंदकिशोर पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस वाचनालयाचे सचिव योगेश पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**



याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष पी. एम. पाटील यांच्यासह घनश्याम पाटील, प्रकाश मराठे, त्रंबक पाटील, राजेंद्र पाटील, असद सय्यद, सिराज शेख, महेंद्र पाटील, बापू महाजन, भिकन लोहार आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी दोन्ही महान नेत्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांना अभिवादन केले. यावेळी संस्थाध्यक्ष पी. एम. पाटील यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे स्वातंत्र्यलढ्यातील अतुलनीय योगदान तसेच बाळासाहेब ठाकरे यांचे समाजकारण व राष्ट्रहितासाठीचे कार्याबाबत गौरवोद्गार काढले.

# जिरायतपाडा जि.प.शाळेत अंधश्रद्धा निर्मूलनावर मार्गदर्शन

प्रतिनिधी । चोपडा

**जिरायत पाडा (ता. चोपडा) येथिल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी चमत्कार सादरीकरण व मार्गदर्शन कार्यक्रम महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती चोपडा यांच्या वतीने सादर करण्यात आला.**



समाजातील अंधश्रद्धा, बुवाबाजी, अज्ञान, चमत्कार यावर विश्वास न ठेवता कोणत्याही गोष्टीचा डोळसपणे विचार करावा, असे आवाहन अंनिसचे कार्याध्यक्ष डॉ. अयुब पिंजारी यांनी यावेळी केले. यावेळी विविध चमत्कार, हातचलाखी प्रयोग डॉ. पिंजारी, अनिल वाडे व संजय अहिरे यांनी सादर केले.

विद्यार्थ्यांनीं याचा आनंद घेतला व आम्ही कोणत्याही अंधश्रद्धेवर विश्वास ठेवणार नाही अशी प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद देवरे यांनी तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापक व्ही.जी.पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिवाजी आव्हाड, बिलदार पावरा, प्रताप बारेला, मगन बारेला, निवृत्ती पाटील यांनी परिश्रम घेतले.

# चोपडा येथील समाजकार्य महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

## • प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रताप महाविद्यालय अमळनेरची विद्यार्थिनी सायली युवराज पाटील हिने पटकावले

प्रतिनिधी । चोपडा

**भगिनी मंडळ चोपडा संचालित समाजकार्य महाविद्यालयातर्फे गोवर्धनदास भिकारीदास उर्फ बाबाजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धेचे २१ वे वर्ष असून यावर्षी आयोजित स्पर्धेसाठी एकूण २४ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता.**

या आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन प्रसिद्ध उद्योजक आशिष गुजराथी यांच्या शुभहस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रताप विद्यामंदिराचे माजी मुख्याध्यापक अवधूत ढबू व प्रताप विद्या मंदिराचे पर्यवेक्षक अतुल भट हे होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भगिनी मंडळ चोपडा या संस्थेच्या अध्यक्षा पूनम आशिष गुजराथी या होत्या. विशेष अतिथी म्हणून संस्थेच्या उपाध्यक्ष छायाबेन अरविंद गुजराथी व संस्थेच्या सहसचिव अश्विनी प्रसन्नालाल गुजराथी या होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सौंदाणकर व उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी तसेच या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून आलेले मेहुल पाटील, संजय बारी, भालचंद्र पवार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीताने झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते गोवर्धनदास भिकारीदास उर्फ बाबाची यांच्या प्रतिमेचे पूजन व त्यानंतर दीपप्रज्वलन करण्यात आले. स्पर्धेचे प्रास्ताविक प्रा.डॉ. अनंत देशमुख यांनी मांडले. त्यानंतर उद्घाटनपर भाषणात प्रसिद्ध उद्योजक आशिष गुजराथी यांनी बाबाजींच्या कार्याविषयी तसेच या स्पर्धेसाठीचा प्रत्येक विषय आजच्या काळात अतिशय समर्पक आहे, असे मनोगत व्यक्त केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे अवधूत ढबू यांनी या स्पर्धेविषयी आपल्या गाण्यातून मत व्यक्त केले. दुसरे प्रमुख पाहुणे प्रताप विद्यामंदिराचे पर्यवेक्षक अतुल भट यांनी बाबाजींच्या कार्याचा आपल्या भाषणातून गौरव केला. कार्यक्रमाचे आभार प्रा. गोपाल बडगुजर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ विनोद रायपुरे यांनी केले.



या वक्तृत्व स्पर्धेसाठी २४ स्पर्धेकांनी सहभागी नोंदवला होता. त्यामध्ये प्रताप महाविद्यालय, अमळनेर डिपार्टमेंट ऑफ सोशल वर्क, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे, दादासाहेब सुरेश जी. पाटील कला शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय चोपडा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज, धुळे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चोपडा, समाजकार्य महाविद्यालय चोपडा, कला व वाणिज्य महाविद्यालय चोपडा इत्यादी महाविद्यालयातील एकूण २४ विद्यार्थी स्पर्धकांनी स्पर्धेक म्हणून सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे परीक्षेक म्हणून संजय बारी, महिला मंडळ माध्यमिक विद्यालय चोपडा, मेहुल पाटील, सी.बी.निकम हायस्कूल घोडगाव, भालचंद्र पवार, आश्रमशाळा सत्रासेन यांनी काम बघितले. या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रताप महाविद्यालय अमळनेरची विद्यार्थिनी सायली युवराज पाटील हिने पटकावले. तर द्वितीय बक्षीस मोराणे येथील अनिल ज्ञानेश्वर बागुल या विद्यार्थ्याने पटकावले. तृतीय बक्षीस यश मोतीलाल माळी याने पटकावले. तर उत्तेजनार्थ प्रथम बक्षीस प्रिया बळीराम पवार, धुळे हिने , द्वितीय बक्षीस अखिलेश मनोज पाटील अमळनेर याने, तृतीय उत्तेजनार्थ कविता रामचंद्र माळी हिने प्राप्त केले.